**CNR NO. MHBI050007242024**

**नियमित दिवाणी दावा क्र. ४०५/२०२४ मधील नि. ४५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज मयत वादीचे वारस यांनी वादी क्र. ४ शेख अब्दुल सलीम पि. अब्दुल अलीम शेख हे मयत झाले असल्याने त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यामध्ये सामील करण्याबाबत दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे कथनानुसार, प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. ४ शेख अब्दुल सलीम पि. अब्दुल अलीम शेख हे दिनांक ११/१२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत व त्यांना **रजीयाबेगम भ्र. अब्दुल सलीम शेख, शेख महंमद आकेफ पि. सलीम शेख, शेख तंजील गोहर भ्र. इम्रान शेख** असे कायदेशीर प्रतिनिधी आहेत व त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. सबब मयत वादी क्र. ४ चे कायदेशीर प्रतिनिधींचे नाव दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचेतर्फे म्हणणे दाखल करुन असे नमुद करण्यात आले आहे की, मयत वादीचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता ९० दिवसांची मुदत आहे व दाव्यातील वादी क्र. ४ हा दिनांक ११/१२/२०२३ रोजी मयत झालेला आहे, अशाप्रकारे अर्जदारांनी कायदा हा जाणुन बुजुन दुर्लक्षीत केलेला आहे, त्यामुळे कायद्याचा अज्ञानपणा हे कारण होऊ शकत नाही, त्यामुळे अर्जदार हे त्यांच्य निष्काळजीपणामुळे खर्च देण्यास पात्र ठरतात, त्यामुळे प्रस्तुत अर्ज रक्कम रु. २०,०००/– च्या खर्च लावुन मंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आलेली आहे.

**०३.** वादीतर्फे विदवान ***विधिज्ञ श्री. एस.एस. व्यवहारे*** यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी तर्फे विदवान ***विधिज्ञ श्री. पि.पि. दहिवाळ*** यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** प्रस्तुतचा दावा हा घोषणा व चिरकाल मनाई हुकुमाची डिक्री मिळणे बाबत दाखल करण्यात आलेला आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, दाव्यातील वाद विचारात घेता मयत वादीचे कायदेशीर प्रतिनिधी यांना दावा पुढे चालविणेचा हक्क अस्तित्वात व अबाधित आहे. तेव्हा अशा परिस्थितीत मयत वादी क्र. ४ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. अर्जदारांतर्फे शपथेवर मयत वादी यांना **रजीयाबेगम भ्र. अब्दुल**

**सलीम शेख, शेख महंमद आकेफ पि. सलीम शेख, शेख तंजील गोहर भ्र. इम्रान शेख** हेच एकमेव कायदेशीर वारस असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे व सदर कथन नाकारण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, वादी व प्रतिवादीमधील वादाचे स्वरुप, दावा स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याची बाब, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम १ व ३ अन्वये वादी क्र. ४ शेख अब्दुल सलीम पि. अब्दुल अलीम शेख यांचे मृत्यूपश्चात त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींना दावा पुढे चालविणेचा हक्क अस्तित्वात राहत असल्याची बाब विचारात घेता मयत वादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे प्रस्तुत दाव्यात न्याय दृष्टीकोनातून आवश्यक आहे. नि.क्र. ४३ वरी आदेशान्वये प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे व यदाकदाचीत झालेला अबेटमेंटच आदेश रद्द करण्यात आलेला आहे. सबब वर नमुद कारणे न्यायहितार्थ प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्याययोग्य आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) निशाणी क्र. ४५ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२) वादीचे वारस/अर्जदार यांना मयत वादी शेख अब्दुल सलीम पि. अब्दुल अलीम शेख यांचे कायदेशीर प्रतिनिधी म्हणून अभिलेखावर येणेची परवानगी देण्यात येते. वादीचे वारसांना/अर्जदारांना दाव्यात त्या अनुषंगे दुरुस्ती करणेची देखील परवानगी देण्यात येते. वादीनी/अर्जदारांनी प्रस्तुत दुरुस्ती ही पुढील तारखेपासून १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्ती दाव्याच्या प्रती न्यायालयात तात्काळ दाखल कराव्यात.

"दावा येणेप्रमाणे पुढे चालेल."

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2025.08.06 11:19:37 +0530

(एम.बी.सोनटकके),
२रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
अंबाजोगाई

दिनांक –०६/०८/२०२५

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 06/08/2025.
Transcribed on : 06/08/2025.
Signed on : 06/08/2025.

Digitally signed by AKASH BASAVRAJ KABNE
Date: 2025.08.06 11:18:50 +0530

Date:06/08/2025.
Place: Ambajogai.

(Akash Kabne)
Stenographer Grade–III
Jt. Civil Court (S.D.), Ambajogai.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 06/08/2025.
Transcribed on : 06/08/2025.
Signed on : 06/08/2025.

Date:06/08/2025.
Place: Ambajogai.

(Akash Kabne)
Stenographer Grade-III
Jt. Civil Court (S.D.), Ambajogai.